अ.क्र.१

(215)

# महाराष्ट्र शासन

शासन ज्ञापन क्र.जमीन२६०७/६५९/प्र.क्र.१६९/ज-३,
महसूल व वन विभाग,
वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दिनांक: ९ जुलै, २०१२.

**विषय : जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे बांद्रा, ता. अंधेरी न.भू.क्र. सी/७९७ येथील ५१ चौ.मी. जमीन
श्रीमती नजूरा अयुब ख्वाजा यांना कब्जेहक्काने मंजूर करणेबाबत.

**शासन ज्ञापन** : जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. सी/कार्या-३ डी/ कावि-१३६२/०६, दि.२/७/२००७ ला अनुसरुन विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे बांद्रा, ता. अंधेरी न.भू.क्र. ७९७ येथील ५१ चौ.मी. क्षेत्राची शासकीय जमीन श्रीमती नजूरा अयुब ख्वाजा यांच्या न.भू.क्र. सी/७९८ अ, सी/६५७, सी/६५८ व सी/६५९ या खाजगी मिळकतीलगत असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ खाली तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील नियम क्रमांक ३७ मधील तरतुदीनुसार सन २०१२ च्या शीघ्रसिध्दगणकाप्रमाणे प्रचलित बाजारमूल्य आकारुन खालीलप्रमाणे अटी व शर्तीवर प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**अटी व शर्ती :-**

१) संदर्भित जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.

२) संदर्भित जमीनीवर बांधकाम करण्यापूर्वी सीआरझेड संदर्भात आवश्यकती परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३) जमिनीचा विकास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्व मंजुरीने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार करणे आवश्यक राहील.

४) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना आवश्यक वाटतील अशा अटी व शर्ती.

शा.स. ३२९

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
दिनांक 13 JUL 2012
आवक 15378

२. सदर शासन ज्ञापन नगर विकास विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२३/२०१२/ व्यय-९, दिनांक १६/६/२०१२ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

प्रतिलिपी -
१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) उपसंचालक, भूमि अभिलेख, मुंबई
८) सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई
११) श्रीमती नजूरा अयुब ख्वाजा, ७०१ एंगल हाऊस, पालीमाला रोड, बांद्रा (प.) मुंबई-४०० ०५०.
१२) ज-३ कार्यासन (निवड नस्ती), महसूल व वन विभाग.

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

**क्र. :-०११/३अ/एफ २९६**
**दिनांक :- १३/५/२०१३**

वाचले १) शासन,महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र.जमिन-२६०६/६५९/प्र.क्र.१६९/ज ३ दिनांक ९/७/२०१२
२) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दिनांक ३/८/२०१२ रोजीचे पत्र
३) श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा यांनी दिनांक १९/१०/२०१२ रोजीच्या पत्रासोबत सादर केलेली रक्कम रुपये ८५,६२,९००/- ची पे ऑर्डर.
४) श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा यांचे दिनांक २५/२/२०१३ रोजीचे निवेदन

[redacted]

**आदेश:**

शासन महसूल व वन विभागाने त्यांचेकडील क्र.जमिन २६०७/६५९/प्र.क्र.१६९/ज ३ ,दिनांक ९/७/२०१२ रोजीच्या ज्ञापनान्वये मौजे बांद्रा तालुका अंधेरी येथील नभूक्र सी ७९८ क्षेत्र ५१.०० चौ.मी.जमीन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ खाली तयार करण्यात आलेल्या म.ज.म.(सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे )अधिनियम मधील नियम क्र ३७ चे तरतूदीनुसार (कब्जेहक्काने ) सन २०१२ च्या शिघ्रसिध्द गणकाप्रमाणे प्रचलित बाजारमूल्य आकारुन ठराविक अटी/शर्तीवर प्रदान करण्यांस मंजूरी दिली आहे.

शासनाच्या उपरोक्त मंजूरीनुसार विषयांकीत जमिनीला शिघ्रसिध्द गणक २०१२ मधील झोन २२/१४० गणना पत्रकानुसार अविकसित जमिनीकरिता रक्कम रुपये १,६७,०००/- प्रति चौ.मी. प्रमाणे देय होणारी रक्कम रुपये ८५,६२,९००/- ( रुपये पंच्याऐंशी लाख बासष्ट हजार नऊशे फक्त ) अर्जदार यांनी दिनांक १९/१०/२०१२ रोजीच्या पत्रासोबत पे ऑर्डर क्र.०४९६११ दिनांक १९/१०/२०१२ अन्वये सदरची रक्कम शासकीय कोषागारात जमा केली आहे.

विषयांकीत जमिन प्रदान करण्याच्या अनुषंगाने अटी/शर्ती मान्य असलेबाबतचा करारनामा श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा यांनी मा.जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांचेसमोर दिनांक १९/१२/२०१२ रोजी स्वाक्षांकीत केला असून सदरचा करारनामा सहदुय्यम निबंधक,अंधेरी क्रमांक ३ मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालयात विषयांकीत जमिनीपोटी देय असलेले नोंदणी शुल्क रुपये ३०,६००/- व मुद्रांक शुल्क रु ४,२८,९५०/- सह दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात जमा करुन करारनामा दिनांक १३/२/२०१३ रोजी नोंदणीकृत केला असून दिनांक २५/२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये जमिनीचा ताबा देण्याची विनंती केली आहे.

**जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१**
**कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in**

यास्तव मी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा दिनांक १९/१२/२०१२ रोजीच्या करारनाम्यातील अटी/शर्तीवर मौजे बांद्रा तालुका अंधेरी येथील नभूक्र सी ७९८ क्षेत्र ५१.०० चौ.मी.जमीन श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा यांना प्रदान करणेस मान्यता देत आहे.त्यानुसार नगर भूमापन अधिकारी बांद्रा यांनी विषयांकीत जमिनीचा ताबा श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा यांना प्रदान करुन ताबा पावती व मिळकत पत्रिका या कार्यालयास सादर करावी.

**टिप: करारनाम्यातील अटी/शर्तीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास अर्जदार कारवाईस पात्र राहतील.**

**सही/-**
**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हा**

प्रति,
श्रीमती नजुरा अयूब ख्वाजा
७०१, अँगल हाऊस
पालिमाला रोड,बांद्रा (पू.)
मुंबई ४०००५०

प्रत नगर भूमापन अधिकारी बांद्रा यांचेकडे दिनांक १९/१२/२०१२ रोजीच्या करारनाम्याच्या छायाप्रतीसह अर्जदार यांना जमिनीचा ताबा देणेच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रत: तहसिलदार अंधेरी यांचेकडे दिनांक १९/१२/२०१२ रोजीच्या करारनाम्याच्या छायाप्रतीसह आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**स्थळप्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे**

15/5/13

**जिल्हाधिकारी**
**मुंबई उपनगर जिल्हाकरिता**

Received.
14/5/13

14/05/13
Issued one only